महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

जा.क्र : तंशिविकापु/विवि/थे.व्दि.व.प्रवेश २०१४-१५/२०२०/ 3882

दिनांक : 17 NOV 2020

प्रति,
कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे / शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर/ पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर/ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये **मुस्लिम आरक्षण (विशेष मागास प्रवर्ग-अ)** अंतर्गत थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षांच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र देणेबाबत...

संदर्भ : १. अल्पसंख्यांक विकास विभाग, यांचा शासन निर्णय अविवि २०१४/प्र.क्र.८१/का ७ दिनांक १९/०७/२०१४.
(सन २०१४ महाराष्ट्र आध्यादेश क्रमांक १४ दिनांक ०९/०७/२०१४)
२. सचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०२०/३२९ दिनांक १३/११/२०२०.

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयान्वये शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागासलेल्या **मुस्लिम** गटासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी **५ टक्के** आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३ ला मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १४/११/२०१४ च्या आदेशान्वये **मराठा** आरक्षणास (**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग-१६ टक्के**) दिलेली अंतरिम स्थगिती कायम ठेवलेली होती व सदर आरक्षणांतर्गत दिलेले प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच **मुस्लिम** आरक्षण (**विशेष मागास प्रवर्ग-अ**) स्थगित करण्यात आलेले आहे. परंतु शासनाने त्या अंतर्गत झालेल्या प्रवेशाचे अनुषंगाने कोणताही निर्णय दिलेला नाही

सदरचे आरक्षणास स्थगिती मिळाल्याने मुस्लिम आरक्षण (विशेष मागास प्रवर्ग-अ) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांचे जातीचे जात-वैधता प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिका विद्यापीठाकडून / संस्थांकडून वितरीत केल्या गेल्या नाहीत.

त्यामुळे या विषयाचे अनुषंगाने मा. मंत्री महोदय, अल्पसंख्यांक विभाग यांचे दालनात दिनांक १०.११.२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदरच्या बैठकीत, यापूर्वी संचालनालयाने दिलेल्या सूचनांनुसार अशा विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत तसेच या प्रवर्गात प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे निकाल निर्गमित करण्याची कार्यवाही करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये **मुस्लिम आरक्षण (विशेष मागास प्रवर्ग-अ)** अंतर्गत थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या **अंतिम वर्षांच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र संबंधित संस्थांना / विद्यार्थ्यांना वितरीत करणेबाबत तात्काळ कार्यवाही करावी.**

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

**प्रत : सर्व पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की,**
ज्या संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मुस्लिम आरक्षण (विशेष मागास प्रवर्ग-अ) अंतर्गत थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमात विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत व अशा विद्यार्थ्यांचे निकाल विद्यापीठांनी राखून ठेवलेले आहेत. अशा संस्थांनी ताबडतोब विद्यापीठाकडून निकाल व प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन विद्यार्थ्यांना त्याचे वाटप करावे.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/ ३२e                                                    दिनांक : 13 NOV 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील अभियांत्रिकी पदवी अंतिम वर्षाची गुणपत्रिका व प्रमाणपत्र मिळणेबाबत...

संदर्भ : मा.मंत्रीमहोदय,अल्पसंख्यांक विभाग यांचे दालनात दिनांक १०.११.२०२० रोजी झालेली बैठक

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मुस्लिम आरक्षणांतर्गत एम.आय.टी.पुणे या संस्थेत प्रवेश झालेल्या श्री शेख शोयब सलिम आणि श्री शेख मोहम्मद सोहेल युसूफ या दोन विद्यार्थ्यांचे निकाल पदवी परीक्षेत उत्तीर्ण होऊनसुध्दा संस्थेने राखीव ठेवले आहेत. याबाबत या विद्यार्थ्यांनी मा. मंत्री महोदय, अल्पसंख्यांक विभाग यांचेकडे निवेदन दिले होते. या संदर्भात दिनांक १०.११.२०२० रोजी मा.मंत्रीमहोदयांच्या दालनात झालेल्या बैठकीत यापूर्वी संचालनालयाने दिलेल्या सूचनांनुसार या विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत.

याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकरणी संचालनालयाने क्रमांक २अ/एडीएम/२०१५/१४४६, दिनांक १५.१०.२०१५ तसेच क्रमांक २अ/एडीएम/२०१९/१८४, दिनांक ५.३.२०१९ अन्वये स्पष्ट सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार या प्रवर्गात प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे निकाल निर्गमित करण्याची कार्यवाही करण्याबाबत संबंधित विद्यापीठांना कळविण्यात यावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
17 NOV 2020
आवक क्र....६७२८....

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

वि.वि.-५
17/11/2020

E:\Budage\2020-21\General Correspondence\declair Result of MIT Students letter to RO Pune.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी 2262 0601, 2269 0602, 2264 1150/51, फॅक्स 2269 2102.
E-Mail desk2a@dte.org.in Internet http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक २अ/एडीएम/२०१५/१४४६
दिनांक 15 OCT 2015

प्रति,

कुलसचिव,

मुंबई विद्यापीठ, मुंबई/एस एन डी टी महिला विद्यापीठ, मुंबई/डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे/ पुणे विद्यापीठ, पुणे/ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर/ डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद/ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव/ स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा. विद्यापीठ, नांदेड/संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती/ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज , नागपूर विद्यापीठ, नागपूर/ सोलापूर विद्यापीठ, सोलापूर/गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेशित असलेल्या व जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या उमेदवारांच्या निकालाबाबत......

महोदय,

वरील विषयानुसार कळविण्यात येते की, संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेनतर प्रवेशित उमेदवारांच्या गुणवत्ता यादया विभागीय कार्यालयांमार्फत पडताळणी करण्यात येतात त्यावेळी गुणवत्ता यादी पडताळणीमध्ये काही मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याच्या त्रुटी आढळून येतात . गुणवत्ता यादया पडताळणी केल्यानंतर त्यामध्ये आढळून आलेल्या त्रुटी प्रवेश नियंत्रण समिती आणि संबंधित विद्यापीठांना पत्राद्वारे कळविण्यात येते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे जात वैधता नसल्यास प्रवेश घेतल्यानंतर ३ महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्राच्या आधारे (Proforma H) प्रवेश करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या मागासवर्गीय उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही अशा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ३०.११.२०१४ पर्यंत प्रवेश घेतलेल्या संस्थेत जमा करणे अपेक्षित होते.

संस्थेच्या गुणवत्ता यादीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींपैकी जात वैधतेच्या त्रुटीबाबत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती यांनी त्यांच्या दिनांक १८.६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अशा प्रकारे जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांच्या त्रुटयांबाबत विद्यापीठाने कोणत्या प्रकारची कार्यवाही अपेक्षित आहे याची विचारणा करून विद्यापीठ स्तरावर अशा त्रुटींतील विद्यार्थ्यांचे निकाल रोखण्यात येतात तरी अशा त्रुटी असलेल्या उमेदवारांचे निकाल रोखण्यात यावेत किंवा जाहीर करावेत याबाबत स्पष्ट निर्देश देण्याबाबत संचालनालयास कळविले आहे.

शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी -१०/२०१३/प्र क्र ३५/ मावक, दिनांक १५ जुलै,२०१४ रोजी मराठा आरक्षणाबाबत आणि शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक अविवि २०१४/प्र.क्र.८१/कासा, दिनांक १९ जुलै,२०१४ रोजी मुस्लिम आरक्षणाबाबत आदेश निर्गमित झालेले होते. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये व्यावसायिक

अभ्यासक्रमांमध्ये सदर प्रवर्गातील प्रवेश करण्यात आले होते. मात्र या प्रवर्गात प्रवेश घेतलेल्या काही उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे अशा उमेदवारांबाबत काय कार्यवाही करावी याबाबतही काही विद्यापीठांकडून विचारणा होत आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित उमेदवारांबाबत एकच धोरण असावे या दृष्टीकोनातून कळविण्यात येते की, शासनाच्या धोरणानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांपैकी ज्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही अशा उमेदवारांना प्रवेशानंतर ३ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्र घेऊन त्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले होते. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१५/प्र क्र ४३/तांशि ४, दि. १८.२.२०१५ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०१३/ प्र क्र ३५४/ भाग-२/ २०१३/१६-ब, दि. २१.२.२०१५ मधील सूचना विचारात घेऊन व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेशित झालेल्या मागास विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. शासन निर्णय दिनांक २१.२.२०१५ मधील परिच्छेद 'इ' मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी जात प्रमाणपत्र,नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र संबंधित सक्षम प्राधिकरणांकडून प्राप्त करून घेणे आवश्यक असल्याने त्यांनी त्यानुसार कार्यवाही करून ती प्रमाणपत्रे त्यांनी प्रवेश घेतलेल्या संस्थेच्या प्राचार्यांमार्फत विभागीय कार्यालयास / संचालनालयास त्यांच्या प्रवेशाबाबत पुढे निर्णय घेण्यासाठी अतिशीघ्र सादर करणे बंधनकारक आहे याची जाणीव त्यांना करून दयावी. त्यांनी उपरोक्त आवश्यक प्रमाणपत्र सादर न केल्यास याबाबत होणा-या परिणामांची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल याची स्पष्ट जाणीव संबंधित विद्यार्थ्यांना करून देण्यात यावी. तसेच परिच्छेदे 'क' मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक १४.११.२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी ,शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील असे निर्देश देण्यात आलेले असल्याने तुर्तात या संवर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले जाणार नाहीत व सदर विद्यार्थी परीक्षेस बसण्यापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी असे संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/६६१, दिनांक ५.५.२०१५ अन्वये या संचालनालयाच्या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांमार्फत सर्व संस्थांना कळविण्यात आलेले आहे.

जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या मुदतीबाबत संचालनालयाकडून शासनाशी पत्रव्यवहार करण्यात येणार असून या प्रकरणी शासनाकडून आदेश प्राप्त झाल्यास त्यानुसार सर्व विद्यापीठांना अवगत करण्यात येईल. तोपर्यंत अशा विद्यार्थ्यांचे निकाल रोखून ठेवण्यात येऊ नयेत,ही विनंती.

आपला,

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहितीसाठी

१)मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई ३२ यांना माहितीसाठी

२)सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

D:\Budage\२०१४-१५\Gen Correspondence\Notice of cancel admission for non submission of validity docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१९/ ९८

दिनांक : 5 MAR 2019

प्रति,

संचालक,

परीक्षा व मूल्यमापन मंडळ,

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे

विषय : शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मराठा व मुस्लिम आरक्षणामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, शासन आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येत आलेल्या थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) Educationally and Socially Backword Category (ESBC) मध्ये समाविष्ट असलेल्या जातींसाठी आरक्षण निर्धारीत केले गेले व त्यानुसार प्रवेश करण्यात आले होते. तथापि सदर प्रवर्गातील आरक्षणास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले आहेत.

तात्कालिन प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास प्रवेश घेतल्यानंतर ३ महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्राच्या आधारे (Proforma H) प्रवेश करण्यात आले होते. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०१३/ प्र क ३५४/ भाग-२/ २०१३/१६-ब, दि. २१.२.२०१५ मधील परिच्छेद 'क' मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक १४.११.२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी, शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील असे निर्देश देण्यात आलेले असल्याने तूर्तास या संवर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले जाणार नाहीत व सदर विद्यार्थी परीक्षेस बसण्यापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी असे संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/६६१, दिनांक ५.५.२०१५ अन्वये या विभागीय कार्यालयामार्फत सर्व संस्थांना कळविले होते. तसेच ही बाब संचालनालयाने पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/१४४६, दिनांक १५.१०.२०१५ अन्वये राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलसचिव यांना कळविली होती.

आता काही विद्यापीठांकडून अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे निकाल घोषित करण्याबाबत स्पष्टता करुन देण्याची विनंती केली आहे. त्या अनुषंगाने येथे असे स्पष्ट करण्यात येते की, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०१३/ प्र क ३५४/ भाग-२/ २०१३/१६ ब, दि. २१.२.२०१५ मधील परिच्छेद 'क' मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक १४.११.२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी, शैक्षणिक संस्थामध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले

प्रवेश अबाधित राहतील असे निर्देश देण्यात आलेले असल्याने अशा विद्यार्थ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल तरी त्यांचे या आरक्षणातून झालेले विद्यार्थ्यांचे अंतिम वर्षाचे निकालही या संचालनालयाने वरील पत्रात नमूद केल्याप्रमाणे निर्गमित करण्यात यावेत.

आपला

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीसाठी सादर

१) मा.सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२

२ ) मा. सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती व नागपूर यांना माहितीसाठी